<table>
<tr><td rowspan="5">CNR No.MHKO200003742024</td><td>दाखल तारीख</td><td>-</td><td>०४</td><td>१०</td><td>२०२४</td></tr>
<tr><td>नोंदणी तारीख</td><td>-</td><td>०४</td><td>१०</td><td>२०२४</td></tr>
<tr><td>निकाल तारीख</td><td>-</td><td>११</td><td>०८</td><td>२०२६</td></tr>
<tr><td colspan="2" rowspan="2">कालावधी</td><td>वर्ष</td><td>महिना</td><td>दिवस</td></tr>
<tr><td>०१</td><td>१०</td><td>०७</td></tr>
</table>

**दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, कळे-खेरीवडे यांचे न्यायालयात.**
**(पिठासीन अधिकारी दिपक रु. बोर्डे यांचे समोर)**

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.०९/२०२४.**
**निशाणी क्रमांक ३५/अ.**

१. **बाळाबाई मारुती डकरे,** ]
व.व.६१, धंदा - घरकाम, ]
रा. मुगडेवाडी, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर. ]

२. **शांताबाई नाना पाटील,** ]
व.व.५८, धंदा- घरकाम, ] अर्जदार..
रा. किसरुळ, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर. ]

३. **गंगूबाई धोंडीराम शेटके,** ]
व.व.६२, धंदा - घरकाम, ]
रा. माळापूडे, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर ]

**- विरुध्द -**

१. **नामदेव रामू मुगडे (मयत) वारस -** ]
१अ. **तानुबाई नामदेव मुगडे,** ] वि.प...
व.व.६०, धंदा- शेती, ]
रा. मुगडेवाडी, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर. ]

**१ब. राजाराम नामदेव मुगडे,** ]
व.व.४६, धंदा - शेती, ]
रा. मुगडेवाडी, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर. ]

**१.क धोंडीराम नामदेव मुगडे,** ]
व.व.४३, धंदा - शेती, रा. सदर. ]

**२. विठ्ठल रामू मुगडे,** ]
व.व. ७४, धंदा - शेती, रा. सदर. ]

**३. किसाबाई यशवंत पाटील,** ]
व.व.६४, धंदा - घरकाम, ] वि.प...
रा. माळापूडे, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर. ]

**४. सखुबाई भाउ मुगडे, (मयत) वारस -** ]
**४अ. आक्कूबाई पांडूरंग कदम,** ]
व.व.७१, धंदा- शेती, ]
रा. काळजवडे पैकी सावंतवाडी, ता. पन्हाळा, ]
जि. कोल्हापूर. ]

**४ब. केरबा भाउ मुगडे,** ]
व.व.६६, धंदा - शेती, ]
रा. मुगडेवाडी, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर ]

**५. मारुती रामचंद्र कातळे (मयत) वारस** ]
**५अ. आनंदी मारुती कातळे,** ]
व.व.६१, धेदा - शेती, ]
रा. पाटपन्हाळा पैकी बांद्रेवाडी, ता. पन्हाळा, ]
जि. कोल्हापूर. ]

**५ब. वंदना बाजीराव पाटील** ]
व.व.४४, धंदा - घरकाम, ]
रा. किसरुळ, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर. ]

**५क. छाया रावसाहेब काटकर,** ]
व.व.४१, धंदा - घरकाम, ]
रा. पोर्ले तर्फ बोरगांव, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर. ]

**५ड. शारदा हिंदूराव मगदूम,** ]
व.व.३९, धंदा - घरकाम, ]
रा. पुनाळ, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर ]

**५इ. दिपक मारुती कातळे,** ] वि.प...
व.व.३६, धंदा - शेती ]
रा. पाटपन्हाळा पैकी बांद्रेवाडी, ता. पन्हाळा ]
जि. कोल्हापूर. ]

**६. श्रीपती रामचंद्र कातळे,** ]
व.व.६२, धंदा - शेती, ]
रा. पाटपन्हाळा पैकी बांद्रेवाडी, ता. पन्हाळा, ]
जि. कोल्हापूर.

**७. रंगराव रामचंद्र कातळे,** ]
व.व.६६, धंदा - शेती, ]
रा. प्लॉट नंबर २५७/५, हनुमान मंदीरासमोर, ]
माउलीनगर, रिंगरोड, फुलेवाडी, कोल्हापूर. ]

**८. शामराव रामचंद्र कातळे,** ]
व.व.६४, धंदा - शेती, ]
रा. पाटपन्हाळा पैकी बांद्रेवाडी, ता. पन्हाळा, ]

जि. कोल्हापूर. ]

**९. बाजीराव रामचंद्र कातळे (मयत) वारस** ]
**९अ. रंजना बाजीराव कातळे,** ]
व.व.४१, धंदा - घरकाम, ]
रा. पाटपन्हाळा पैकी बांद्रेवाडी, ता. पन्हाळा, ]
जि. कोल्हापूर. ]

**९ब. अश्विनी श्रीकांत चौगले** ]
व.व.२५, धंदा - घरकाम, ]
रा. बोरगांव, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर ]

**९क. उज्वला संदीप मुगडे,** ]
व.व.२१, धंदा - घरकाम, ]
रा. किसरुळ, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर. ]

**९ड. विशाल बाजीराव कातळे,** ] वि.प...
व.व.२४, धंदा - शिक्षण, ]
रा. पाटपन्हाळा पैकी बांद्रेवाडी, ता. पन्हाळा, ]
जि. कोल्हापूर ]

**१०. बाळाबाई दत्तात्रय पाटील,** ]
व.व. ५६, धंदा - शेती व घरकाम, ]
रा. काळजवडे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर. ]

**११. श्रावणी राजाराम पाटील,** ]
व.व.५३, धंदा - शेती व घरकाम, ]
रा. पुनाळ, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर. ]

**१२. निवास ज्ञानू पाटील,** ]
व.व.६६, धंदा - शेती, ]
रा. पाटपन्हाळा, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर. ]

**१३. दगडू ज्ञानू पाटील** ]
व.व. ६३, धंदा - शेती, ]
रा. पाटपन्हाळा, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर. ]

**१४. शालाबाई कृष्णा कातळे,** ]
व.व.६१, धंदा - शेती व घरकाम, ]
रा. कातळेवाडी, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर. ]

**१५. आनंदी श्रीपती काटकर,** ] वि.प...
व.व.५९, धंदा - शेती व घरकाम ]
रा. पोर्ले, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर. ]

**१६. मालाबाई मारुती पाटील** ]
व.व.५७, धंदा - शेती व घरकाम, ]
रा. पाटपन्हाळा पैकी बांद्रेवाडी, ता. पन्हाळा, ]
जि. कोल्हापूर. ]

**१७. बंडा दत्तू चौगले,** ]
व.व. ६३ , धंदा - शेती, ]
रा. मुगडेवाडी, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर. ]

**१८. विठ्ठल दत्तू चौगले,** ]
व.व.६१, धंदा - शेती ]
रा. मुगडेवाडी, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर. ]

| | | |
|---|---|---|
| **१९. पांडूरंग दत्तू चौगले, व.व. ५९,** | ] | |
| स्वतःस चैतन्य महाराज असेही संबोधतात, | ] | वि.प... |
| रा. ज्ञानेश्वर माउली मंदीर, सौते, ता. शाहूवाडी, | ] | |
| जि. कोल्हापूर. | ] | |

---

अर्जदारतर्फे विधिज्ञ - अॅड. श्री. आर. एम. कालेकर
वि.प.क्रं.१ ते १९ विरुध्द - एकतर्फा.

---

**न्यायनिर्णय**

**(घोषित दि.११ ऑगस्ट, २०२६)**

अर्जदार यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१,१५२ व १५३ अन्वये न्यायनिर्णय व हुकूमनामा दुरुस्ती होवून मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**अर्जदारांचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे** -

**०२.** अर्जदार क्रं.१ यांनी मे. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पन्हाळा यांचे न्यायालयात वाटपासाठी आणि कायम मनाईसाठी दाखल केलेला नियमित दिवाणी वाद क्रं.२१७/२०१२ हा दि.०७/०४/२०१७ रोजी खर्चासह अंशतः मंजुर केला आहे. सदरहू निकालानुसार वादीचा दावा मिळकत १-अ मधील घर मिळकती व १-ब मधील शेतजमिनीमध्ये ११/२१० इतका हिस्सा असलेचे घोषित केले.

**०३.** त्या दाव्यामध्ये अर्जदार क्रं.२ शांताबाई नाना पाटील ही प्रतिवादी क्रं.५ होती तर अर्जदार क्रं.३ गंगूबाई धोंडीराम शेटके ही प्रतिवादी क्रं.४ होती. अर्जदार क्रं.१ ते ३ हया सख्ख्या बहिणी आहेत. अर्जदार क्रं.२ व ३ यांचाही अर्जदार क्रं.१ प्रमाणे दावा मिळकत १-अ घर मिळकती आणि १-ब शेतजमिनींमध्ये ११/२१० इतका हिस्सा आहे.

**०४.** त्या दाव्यातील वाद मिळकतींचे वर्णन पाहता १-अ मध्ये नमुद केलेप्रमाणे मुगडेवाडी, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर येथील ग्रामपंचायत मिळकत क्रं.३३१,३३२ आणि ३६५ ही तीन घरे तसेच १-ब मध्ये नमुद केलेप्रमाणे मुगडेवाडी, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर येथील शेतजमिनी एकुण सतरा दिसुन येतात. त्यानंतर १-क मध्ये दावेतील वादीने किसरुळ येथील शेतजमिनी गट क्रं.२६१ क्षेत्र २४आर. ही मिळकत सुध्दा नमुद केली होती. परंतु, दावेच्या निकालामध्ये सदरहु १-क मधील नमुद शेतजमिन गट क्रं.२६१ चा काही उल्लेख केलेला नाही. त्या दाव्यातील न्यायनिर्णय पाहता प्रत्येक ठिकाणी दावा मिळकती असा उल्लेख दिसुन येतो. मात्र अंतिम आदेशामध्ये फक्त दावा मिळकती १-अ आणि १-ब यांचाच उललेख केला गेला आहे. सदरच्या दाव्यामध्ये मा. न्यायालयाने जे मुद्दे काढलेले आहेत त्यामध्ये दावा मिळकती असा उल्लेख दिसून येतो. निकालपत्राचे अवलोकन केले असता दावा मिळकत १-क ही वाटपास पात्र नसलेबाबतचा निष्कर्ष आणि कारणे दिसुन येत नाहीत. त्यामुळे सदरचे न्यायनिर्णयातील अंतिम आदेशामधील कलम २ मध्ये नजरचुकीने दावा मिळकत १-क चा उल्लेख करण्याचा राहुन गेलेचे दिसते. सदरचे दावेतील न्यायनिर्णयावर कोणीही कोणतेही अपील दाखल केलेले नाही. त्यामुळे आजमितीस सदरचा न्यायनिर्णय कायम आहे.

**०५.** प्रस्तुत दावेच्या निकालानंतर अर्जदार क्रं.१ आणि २ व ३ यांनी आपसांत तडजोड केली आहे म्हणुन या अर्जाचे कामी अर्जदार क्रं.२ व ३ यांना अर्जदार असे नमुद केले आहे. अर्जदारांमधील आपसात तडजोडीनुसार अर्जदार क्रं.२ व ३ यांना मिळणारा प्रत्येकी ११/२१० इतका हिस्सा हा त्यांनी अर्जदार क्रं.१ यांना देवविण्यास स्वेच्छेने, विना मोबदला, विना दडपण संमती दर्शवली आहे.

**०६.** दावेतील नमुद वाद मिळकती आणि न्यायनिर्णयातील अंतिम आदेश या मध्ये तफावत असलेने ती दुरुस्त होवून मिळणे आवश्यक असलेने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. सबब, अर्जदारांच्या विनंतीनुसार नियमित दिवाणी वाद

क्रं.२१७/२०१२ च्या दिनांक ०७-०४-२०१७ इ. रोजीच्या न्यायनिर्णयातील अंतिम आदेशामधील कलम २ मध्ये अर्जदारांचा दावा मिळकती १-अ, १-ब आणि १-क मध्ये सामाईक ११/२१० इतका हिस्सा आहे अशी दुरुस्ती न्यायाचे कारणास्तव नमुद करण्यात यावी अशी विनंती अर्जदार यांनी केली आहे.

**०७.** वि.प. क्रं.१ ते १९ यांचे विरुध्द नि.क्र.१ कडील दि.२४/०७/२०२५ रोजीचे आदेशाने एकतर्फा अर्ज चालवणेचे आदेश पारित आहे.

**०८.** अर्जदार यांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुत अर्ज व अभिलेखावरील कागदोपत्री पुरावा विचारात घेता खालील प्रश्नबिंदू विचारार्थ उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष खालील नमूद कारणानुसार नोंदविले आहेत.

| **अ.क्र.** | **प्रश्नबिंदू** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे नियमित दिवाणी वाद क्रं.२१७/२०१२ च्या दि.०७-०४-२०१७ इ. रोजीच्या न्यायनिर्णयातील अंतिम आदेशामध्ये मागणी केलेली दुरुस्ती होऊन मिळणेस पात्र असल्याचे अर्जदार यांनी सिध्द् केले आहे का ? | नकारार्थी |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>कारणमिमांसा</u>

**०९** अर्जदार यांचे विधीज्ञ अॅड. श्री. आर. एम. कालेकर यांनी असा युक्तीवाद केला की, दिवाणी दावा क्रं.२१७/२०१२ चे वादपत्र व त्यावरील प्रतिवादींचा लेखी जबाब तसेच दि.०७/०४/२०१७ रोजीचा न्यायनिर्णय यांचे एकत्रीत अवलोकन केले असता असे दिसुन येते की, नजरचुकीने न्यायनिर्णयातील अंतिम आदेशामध्ये दावा मिळकत १-क चा उल्लेख करण्याचे राहुन गेले. प्रस्तुत न्यायनिर्णयाच्या विरुध्द प्रतिवादींनी अपील केलेले नाही. मागणी केलेली दुरुस्ती झाल्यास कोणत्याही पक्षकाराच्या कायदेशीर हक्कास हानी पोहोचणार नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजुर

करणेत यावा असा युक्तीवाद केला. अर्जदार यांनी ***<u>Dumari S/O Saddu Goud (Deceased) Through Legal Heirs Vs. Gayatri D/O Late Dumri Lal Goud in Civil Revision No.256/2023 decided on 07/02/2024 before Hon'ble High Court of Madhya Pradesh at Jabalpur</u>*** या मा. उच्च न्यायालयच्या न्यायनिर्णयाचा आधार घेतला.

**<u>प्रश्नबिंदू क्र.१ व २ करीता</u>**

**१०.** अर्जातील कथने सिध्द् करण्यासाठी वादी क्रं.१ बाळाबाई मारुती डकरे यांनी त्यांचे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र.२९ वर साक्षीदार क्र.०१ (सा.क्र.१) म्हणुन दाखल केले आहे. अर्जदार यांनी नि.क्र.२८ चे दस्तऐवज यादीसोब रे.क.नं.२१७/२०१२ मधील हुकूमनामा, न्यायनिर्णय, प्रतिवादी क्रं.१ ते ३ यांची कैफियत, प्रतिवादी क्र.४ व ५ यांची कैफियत तसेच दिवाणी किरकोळ अर्ज क्रं.३७/२०१७ मधील नि.क्र.१ ची प्रत इत्यादी कागदपत्रांच्या सही शिक्कयांच्या नक्कला अभिलेखावर दाखल केल्या आहेत. तद्नंतर अर्जदार यांनी नि.क्र.३० कडे पुरसीस दाखल करुन अर्जदारांचा पुरावा संपल्याचे न्यायालयास कळवले आहे.

**११.** अभिलेख व त्यावरील दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. वर उल्लेख केल्याप्रमाणे प्रस्तुतचा अर्ज वि.प. यांचे विरुध्द एकतर्फा चालला असल्याने अर्जदारतर्फे साक्षीदार क्रं.१ यांचा उलटतपास वि.प. यांनी नोंदवलेला नाही. तसेच वि.प. यांनी त्यांचा पुरावा देखील अभिलेखावर दाखल केलेला नाही.

**१२.** अर्जदारांचे असे कथन आहे की, न्यायनिर्णयातील अंतिम आदेशामधील कलम २ मध्ये नजरचुकीने दावा मिळकत १-क चा उल्लेख करण्याचे राहुन गेलेचे दिसते. वादीने दाव्यामध्ये मिळकत १-क चा उल्लेख केलेला आहे. मुद्दया मध्ये दावा मिळकत उल्लेख दिसुन येतो. तसेच निकालपत्राचे अवलोकन केले असता दावा मिळकत १-क ही वाटणीस पात्र नसलेबाबतचा निष्कर्ष आणि कारणे दिसुन येत नाही.

त्यामुळे निष्पन्न त्रुटी दुर होणे आवश्यक व न्यायाचे आहे.

**१३.** अर्जदार यांनी ***Dumari S/O Saddu Goud (Deceased) Through Legal Heirs Vs. Gayatri D/O Late Dumri Lal Goud in Civil Revision No.256/2023 decided on 07/02/2024 before Hon'ble High Court of Madhya Pradesh at Jabalpur*** या मा. उच्च न्यायालयच्या न्यायनिर्णयाचा भिस्त ठेवली आहे. सदर न्यायानिर्णयाचे अवलोकन केले. सदर न्यायनिर्णयाचा मतीतार्थ असा दिसुन येतो की, न्यायनिर्णयामध्ये एखादी गोष्ट लिहायची राहुन गेली व न्यायनिर्णय वाचल्यानंतर असे स्पष्ट दिसुन येते की, न्यायालयाचा उद्देश होता की, ती गोष्ट न्यायनिर्णयामध्ये नमुद असायला पाहिजे होती. परंतु, नजरचुकीने ती गोष्ट न्यायनिर्णयामध्ये नमुद करण्याची राहुन गेली.

**१४.** अर्जदार यांनी नि.क्र.२८ चे दस्तऐवज यादीसोब दाखल केलेल्या रे.क.नं.२१७/२०१२ मधील न्यायनिर्णयाचे अवलोकन केले. त्यामध्ये परिच्छेद क्रं.१ व २ मध्ये स्पष्टपणे मौजे मुगडेवाडी, ता. पन्हाळा मधील मिळकतीबाबत उल्लेख केलेला दिसतो व त्यापुढे न्यायनिर्णयामध्ये दावा मिळकती असे नमुद केलेले आहे. न्यायनिर्णयामध्ये वादपत्रातील मिळकत क्रं.१-क मौजे किसरुळ, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर या मिळकतीचा न्यायनिर्णयामधील वादीचे कथन, पुरावा, युक्तीवाद व कारणमिमांसेमध्ये कोठेही उल्लेख केलेला नाही. यावरुन दावा मिळकबत १-क नजरचुकीने दाव्यात नमुद करणेचे राहुन गेले असे ठामपणे म्हणता येणार नाही. वरील मा.उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयांचा ऊहापोह केलेला आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयामध्ये असे नमुद आहे की, न्यायालय केवळ आपल्या निकालात, हुकूमनाम्यात किंवा आदेशात नेमके काय म्हणायचे होते, याबद्दल कोणतीही वाजवी शंका नाही त्याच आधारावर न्यायनिर्णय किंवा हुकूमनामा मध्ये दुरुस्ती करु शकते. दिवाणी दावा क्रं.२१७/२०१२ च्या न्यायनिर्णयामध्ये दावा मिळकत क्रं.१-क न्यायनिर्णयामध्ये समाविष्ठ करायचे होते, परंतु

ते तसे करण्याचे राहुन गेले ही बाब न्यायनिर्णय वाचल्यानंतर कोणतीही वाजवी शंका निर्माण करत नाही असे अर्जदाराने सिध्द केलेले नाही. त्यामुळे प्रस्तुतच्या आर्जात नमुद केलेली प्रार्थना मंजुर होण्यास पात्र नाही. परिणामतः **प्रश्नबिंदू क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी** नोंदवून प्रश्नबिंदू क्र.२ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. दोन्ही पक्षकारांनी आपआपला खर्च सोसावा.

( न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत )

Digitally signed by DIPAK RUSTUMRAO BORDE
Date: 2026.08.11
17:46:58 +0530

**( दिपक रु. बोर्डे )**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
कळे-खेरीवडे.

कळे-खेरीवडे.
दि. ११.०८.२०२६.